# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18/07/2023 (मंगळवार) सकाळ

---

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत आठवडी बाजार मोवाड येथील नगर परीषद कॉम्प्लेक्स समोरील रोडवर दिनांक १७/०७/२०२३ चे रात्री १०.३० वा. ते दिनांक १८/०७/२०२३ चे सकाळी ०७.०० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने कोणत्यातरी अज्ञात कारणावरून आठवडी बाजार मोवाड येथील नगर परीषद कॉम्प्लेक्स समोरील रोडवर **मृतक नामे– मुन्नी उर्फ मंजुशा रामदास आमटे वय ५० वर्ष, रा. मोवाड** हिला जिवानीशी ठार मारून रोडचे बाजूला असलेल्या सिमेंट नालीचे चेंबर मधुन नालीचे आत मध्ये टाकले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दिलीप किसनाजी बनाईत, वय ३५ वर्ष, रा. वार्ड नं. १४ मोवाड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३०२, २०१ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन नरखेड येथील ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक क्रिष्णा तिवारी मो. नं. ८८८८८०३२९४ हे करीत आहे.

## गांजाची साठवणुक करून विक्री करणाऱ्या आरोपीला अटक
## पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरीची कारवाई

मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. विशाल आनंद यांचे आदेशाने पोलीस स्टेशन एम. आय. डी. सी बोरी येथील स्टाफ दिनांक १७/०७/२०२३ रोजी नागपूर विभागात अवैध धंदे विरूद्ध कारवाई करीता पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, एक इसम पिपरडीह लामारी येथे इन्व्हेटीस कंपनीच्या बाजुला लेबर लोकांसाठी राहणाऱ्या शेड मध्ये अंमली पदार्थ गांजाची ग्राहकांना विक्री करण्याच्या उद्‌देशाने साठवणुक करून विक्री करीत असल्याची खात्रीशीर माहीती मिळाल्याने नमुद ठिकाणी सापळा रचुन **आरोपी नामे– विश्णु केश्वर राजवार, वय ५२ वर्ष रा. पिपरडीह लामारी कला गढवा जि. झारखंड ह. मु. इन्व्हेटीस कंपनीच्या वर्कर रूम मौजा सालईधाबा ता. हिगणा जि. नागपुर** त्याचे अंग झडती मध्ये पॅटच्या उजव्या खिशात मोबाईल डाव्या खिशात एक प्लास्टिक पॅकेट मध्ये गुंगीकारक वनस्पती गांजा मिळुन आला. आरोपीच्या ताब्यातुन एकुण मुद्‌देमाल वजन ०.५९३ किलोग्रॅम गांजा किंमती अंदाजे ५९३०/– रूपयाचा मुद्‌देमाल जप्त करण्यात आला. त्याला त्या गांजा बाबत विचारले असता सदर गांजा हा गावातुन नौकरी करीता नागपूरला येत असतांना त्याने आपल्या गावातुन आणला आहे असे सांगीतले.

सदर बाबत पोलीस स्टेशन एम. आय. डी. सी. बोरी येथे आरोपीविरूद्ध कलम ८ (क) ३० (ब) II (अ) एन. डी. पी. एस. ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन एम. आय. डी. सी. बोरी येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक महादेव आचरेकर, पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर राय, पोलीस नायक आशिष बोरकर, श्रीकांत गौरकर, पोलीस शिपाई निखील शेगावकर यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर